लोकमत

सायबर सुरक्षेबाबत व्यापक जनजागृती केल्याबद्दल

# घोगरे महाविद्यालयासह समन्वयक व विद्यार्थ्यांच्या संघाला पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** सायबर हल्ला आंतरराष्ट्रीय पातळीवरील समस्या बनली आहे. सायबर सुरक्षेबाबत जनजागृती केल्याबद्दल येथील डॉ. पा.रा. घोगरे विज्ञान महाविद्यालय हे 'उत्कृष्ट महाविद्यालय' तर डॉ. स्वाती बोरसे या 'उत्कृष्ट समन्वयक' आणि दिव्या बच्छाव व पूर्वा बोरसे या विद्यार्थिनींच्या संघाला 'उत्कृष्ट संघ' पुरस्कार मिळाला. पुणे येथे क्विकहील फाउंडेशनमार्फत 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अवॉर्ड २०२४' या कार्यक्रमात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

सायबर हल्ला आंतरराष्ट्रीय पातळीवरील समस्या बनली आहे. सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्रातील ३० महाविद्यालयांची निवड केली गेली. त्यात घोगरे विज्ञान महाविद्यालयाला कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातून निवड केली. क्विकहील फाउंडेशन, पुणे यांनी संगणक शास्त्र विभागासोबत सामंजस्य करार केला.

फाउंडेशनच्या सीएसआर एक्झिक्युटिव्ह सुगंधा दाणी यांनी सायबर सुरक्षेविषयी कार्यशाळा घेतली. गायत्री पवार यांनी २० विद्यार्थ्यांची सायबर योद्धा म्हणून निवड केली. त्यांना 'सायबर सुरक्षा व जागरूकता' या विषयावर 'कमवा व शिकवा' या योजनेअंतर्गत प्रशिक्षण दिले.

क्विकहील फाउंडेशनचे कार्यकारी संचालक व संस्थापक कैलाश काटकर व चेअरमन अनुपमा काटकर यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. एम.व्ही. पाटील, समन्वयक प्रा.डॉ. स्वाती बोरसे, विद्यार्थी दिव्या बच्छाव, पूर्वा पंचारिया, डिंपल चव्हाण व जानवी वाणी यांनी पुरस्कार स्वीकारला.

कार्यक्रमाला संजय काटकर, महाराष्ट्र सायबर सेलचे पोलिस अधीक्षक संजय शिंत्रे, जळगावचे कुलगुरू व्ही.एल. माहेश्वरी, सोलापूरचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवार यांची उपस्थिती होती. उपप्राचार्य प्रा. के.एम. बोरसे, कुलसचिव मुकेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. चेअरमन कुणाल पाटील, एस.टी. यांनी कौतुक केले.



कैलाश काटकर, अनुपमा काटकर यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना डॉ.एम.व्ही. पाटील, डॉ. स्वाती बोरसे आणि विद्यार्थीनी दिव्या बच्छाव, पूर्वा पंचारिया, डिंपल चव्हाण व जानवी वाणी.

- समन्वयक डॉ. स्वाती बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली हे सायबर योद्धे धुळे व जळगाव जिल्ह्यातील ३० शाळा व महाविद्यालयात पोहोचले. तेथे त्यांनी व्याख्याने, प्रेझेंटेशन, पथनाट्य, नाटिका या माध्यमातून ऑनलाइन फ्रॉड, गेमिंगद्वारे आपला पैसा व स्वत:च्या महत्त्वाची माहिती कशी चोरी होते व आपण कसे सुरक्षित राहू शकतो यावर १३ हजार २११ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून मार्गदर्शन केले. गणपती मंडळ, प्रायव्हेट क्लास, ज्येष्ठ नागरिक संघ, शासकीय कार्यालय, विविध मंदिरांतील लोकांपर्यंत पोहोचले. एकाच वेळी ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांसमोर तीन नाटिका सादर करून सायबर गुन्हेविषयी जागृती केली. क्विकहीलने दखल घेत पुरस्कारांसाठी निवड केली.